# मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४

संदर्भ क्र.:एमएमसीसी/ महाराष्ट्र स्टेट स्कॉलरशिप / २०२५-२०२६/१८ २०/०६/२०२५

## नोटीस

**स्पेशल ड्राईव्ह - १**

**मागासवर्गीय, खुल्या, एसईबीसी, ईडब्लूएस, अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थी तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजने अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२४-२०२५ करीता FRESH चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता स्पेशल ड्राईव्ह - १ सोमवार व बुधवार २३/०६/२०२५, २५/०६/२०२५ रोजी महाविद्यालयात आयोजित होणेबाबत..**

वरिष्ठ महाविद्यालयात प्रथम वर्ष बीबीए, बीबीए (आय बी), बीबीए (सी ए) एआयसीटीइ समावेश झालेल्या अभ्यासक्रमातील सर्व पात्र **मागासवर्गीय, खुल्या, एसईबीसी, ईडब्लूएस, अल्पसंख्याक** व आणि **उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजने अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींसाठी** स्कॉलरशिप अथवा फ्रीशिपचे अर्ज भरणे क्रमप्राप्त आहे. तसेच खुल्या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना देखील विविध स्कॉलरशिपचा लाभ घेता येतो. सदरील स्कॉलरशिप अथवा फ्रीशिप अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याची प्रक्रिया सन २०२४-२०२५ करीता चालू झालेली असून, जे विद्यार्थी अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील असून तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजने अंतर्गत, शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत अश्या विद्यार्थ्यांनी FRESH चे अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. सर्व पात्र नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे व ज्या विद्यार्थ्यांनी या पूर्वी वरील नमूद वेबसाईटवर अर्ज भरले आहेत अश्यानी त्यांचे या पूर्वीच्या userid नेच अर्ज भरावयाचे आहेत. नवीन तयार केलेला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी. सदर अर्ज भरतेवेळी नमूद केलेले सर्व ओरिजनल कागपत्रे २५६ kb च्या आत jpeg स्वरूपात अपलोड करावे लागतात. https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतेवेळी विदयार्थ्यांना बऱ्याच अडंचणीचा सामना करावा लागतो. याकरिता महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याकरिता स्पेशल ड्राईव्हचे आयोजन केले आहे.

**स्कॉलरशिप व फ्रीशिप स्पेशल ड्राईव्ह**
**वार व दिनांक: सोमवार व बुधवार २३/०६/२०२५, २५/०६/२०२५**
**वेळ: सकाळी १०.३० ते ४.३०**
**ठिकाण: बीबीए (सी ए) कॉम्प्युटर लॅब, एमएमसीसी कॉलेज, २०२/ए, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४**

जे विद्यार्थी **अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव/खुल्या/ एसईबीसी/ईडब्लूएस/अल्पसंख्याक** संवर्गातील शिष्यवृत्तीस अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत अश्या विद्यार्थ्यांनी FRESH तसेच RENEWAL चे अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता खालील नमूद केलेले सर्व ओरिजनल कागपत्रे २५६ kb च्या आत jpeg स्वरूपात पेनड्राईव्ह मध्ये अथवा स्वतःच्या ई-मेल आयडीवर अपलोड करण्यासाठी तयार ठेवावेत, जेणेकरून अर्ज भरताना कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही.

चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी Marathwada Mitra Mandal's College of Commerce (१६२८०) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे व फी भरल्याबाबतच्या रकान्यात ०.०० (शून्य रुपये) असे नमुद करावे व महाविद्यालयाने ऑनलाईन पारित केलेली फी ची पावती शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शिकत असलेल्या वर्गाकरिता अपलोड करावी.

**शिष्यवृत्ती (Scholarship) साठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/- पर्यंत आहे व व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीता रु. १,५०,०००/-** पर्यंत आहे. तसेच **अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती साठी फ्रीशिप (Freeship) साठी उत्पन्न मर्यादा नसून व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव/खुल्या एसईबीसी/ईडब्लूएस /अल्पसंख्याक फ्रीशिप (Freeship) साठी ची कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/- इतकी आहे.** BBM-IB या अभ्यासक्रमाकरीता व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील विद्यार्थ्यांना कुठल्याही शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप चा लाभ घेता येणार नाही याची सर्वानी कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | १० वी, १२ वी/ ग्रॅज्युएशन उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (ओरिजनल) |
| २. | विद्यार्थ्यांच्या नावाचे डोमेसाइल सर्टिफिकेट (ओरिजनल) |
| ३. | विद्यार्थ्यांच्या नावाचा जातीचा दाखला (ओरिजनल) |
| ४. | विद्यार्थी अल्पसंख्याक असल्यास अल्पसंख्याक असल्याचा दाखला |
| ५. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२०२४चा तहसीलदार चा दाखला (उत्पन्न मर्यादा योजनेच्या नियमांनुसार) (Original) व Non Cremay Certificate (Original) लागू असल्यास |
| ६. | आधारकार्ड (ओरिजनल) |
| ७. | राशनकार्ड (ओरिजनल) |
| ८. | विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकचे पहिले पान (ओरिजनल) |
| ९. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (ओरिजनल) |
| १०. | चालू वर्षा करीता पालकांचे अपत्यां बाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र |

MAHADBT पोर्टल वर ऑनलाईन अचूक अर्ज भरलेल्या अर्जाची प्रत व इतर वरील वरिल नमूद केल्या क्रमवारीनुसार कागदपत्रे महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात त्वरित जमा करावे. वेळेत न प्राप्त झालेल्या अर्जांवर महाविद्यालयाकडून कुठल्याही प्रकारची कार्यवाही होणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

सर्व मागासवर्गीय पात्र विदयार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार लागू असल्याप्रमाणे स्कॉलरशिप अथवा फ्रीशिपचा अर्ज भरणे क्रमप्राप्त असून, तो न भरल्यास अथवा मंजूर न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील व महाविद्यालयाची शैक्षणिक फी व इतर उर्वरित फी भरणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील. व त्याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार स्वीकारली जाणार नाही.

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

**श्रीमती. हर्षला वाडकर**
प्रशासन अधिकारी

**डॉ. गणेश पटारे**
प्रभारी प्राचार्य